तरुण भारत मंगळवार, ५ एप्रिल २०२२

# 'रवळनाथ'च्या रौप्यमहोत्सवी ठेव योजनेला प्रतिसाद

**गडहिंग्लज :** रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्य महोत्सवी ठेव योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. ९ शाखांत २२ कोटी ५३ लाखाच्या



ठेवी जमा झाल्या. गुढी पाडव्याच्या एका दिवशी तब्बल २ कोटी २८ लाखाच्या ठेवी जमा झाल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी सांगितले. एकूण २२ कोटी ५३ लाखाच्या ठेवी जमा झाल्या आहेत. आकर्षक दराची रौप्य महोत्सवी ठेव योजना जाहीर केली होती, त्याला सर्वच शाखांतून प्रतिसाद मिळाला. उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, सीईओ डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, एकनाथ केसरकर यांच्यासह इतरांनी परीश्रम घेतले.